# NAGPUR CITY POLICE COMMISSIONERATE

नागपूर शहर पोलीस आयुक्तालय

(पोलीस वार्तापत्र)

सकाळ

---

दिनांक 15.03.2019 शुक्रवार

(गुन्हे)

**1) दारुबंदी, जुगार व ड्रंकन ड्राईव्ह कायदा अंतर्गत करण्यात आलेली कारवाई :**

मुदाका अन्वये 18 केसस 18 आरोपींना अटक करून 27,678 रू चा मुद्येमाल जप्त करण्यात आला. जुगार कायदा अन्वये 08 केसस 08 आरोपींना अटक करून 8,145 रू चा मुद्येमाल जप्त करण्यात आला.

मद्य प्राशन करुन वाहन चालविणा–या 14 वाहन चालकांवर कारवाई करण्यात आली आहे. वाहतुक शाखा पोलीसांनी मोटार वाहन कायद्यान्वये विविध कलमांखाली एकूण 1054 वाहन चालकांवर कारवाई करण्यात आली असून एकूण तडजोड शुल्क 2,42,100 वसुल करण्यात आले आहेत.

वरील सर्व मोहीम एकत्रितरित्या नागपूर शहर पोलीसांतर्फे राबविण्यात आल्या असून या पुढेही कारवाई प्रभावीपणे करण्यात येणार आहे. वाहन चालकांनी वाहन चालवितांना वाहनासंबंधी सर्व कागदपत्रे जवळ बाळगावित असे नागरीकांना आवाहन करण्यात येत आहे.

**2) पो.स्टे. बेलतरोडी – गैरकायद्याची मंडळी जमवून जिवानीशी ठार मारण्याचा प्रयत्न करणा–या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल :**

दिनांक 14.03.19 चे 2030 वा चे सुमारास फिर्यादी धिरज दयाशंकर बघेल, वय 21 वर्ष, रा. लोखंडे नगर, बौध्द विहार, तेलमारे किराणा दुकाना जवळ, नागपूर व हिमांशु चंद्रकर, वय 23 वर्ष, रा. त्रिमुर्ती नगर, ओरीएन्ट वाईन शॉप मागे, नागपूर हे डिओ गाडीवर बसून पो.स्टे. बेलतरोडी हद्दीत मनिष नगर, ताजश्री शोरूमच्या गल्लीमध्ये आले असता त्या ठिकाणी आरोपी क्र. 1) अपुर्वा नागपूरकर, वय 24 वर्ष, व तिचा भाऊ दोन्ही राहणार जयताळा, आखरी बस स्टॉप, नागपूर हे पुर्वीच उभे होते हिमांशु हा गाडीवरून उतरून अपुर्वा जवळ गेला व 20 ते 25 मिनिट बोलल्यानंतर त्याचे 6 साथीदार 20 ते 25 वर्ष वयोगटातील हे हाता मध्ये लाठया काठया घेवून येवून हिमांशुला मारहाण करीत असता फिर्यादी हा हिमांशुला वाचविण्याकरीता गेला असता त्यापैकी दोन आरोपीतांनी फिर्यादीस पकडून ठेवले व आरडा ओरड झाल्याने लोक जमले असता आरोपींनी फिर्यादीस जबरदस्तीने मोटार सायकलवर बसवून व हिमांशुला जबरदस्तीने मोपेड गाडीवर बसवून जयंती नगरी 2, निरंजन नगर येथे नेवून हिमांशुला मारहान करून गंभीर दुखापत करून जिवानीशी ठार मारण्याचा प्रयत्न केला. व फिर्यादीस धमकी देवून पळून गेले. याप्रकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पो. स्टे. बेलतरोडी येथे पोहवा कृष्णा, 9373677442 यांनी आरोपीविरूध्द कलम 364,307,143,147,148, 149,341,506 भादंवि सहकलम 135 मपोका अन्वये गुन्हा नोंदविला आहे. (जखमीचा उपचार मेडीकल हॉस्पीटल येथे सुरू आहे.)

**3) पो.स्टे. सक्करदरा, जरीपटका – अपहार करणा–या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल :**

<u>1) सक्करदरा</u> – दिनांक 09.02.14 ते 13.02.14 दरम्यान आरोपी क्र. 1) रामकृष्ण लक्ष्मण ठेंगडी, वय 64 वर्ष, रा. 301, चैतन्य अपार्टमेंट, अमरावती रोड, भरत नगर, नागपूर, 2) राजाराम रामचंद्रजी डोनारकर, वय 55 वर्ष, रा. सुयोग सायकल स्टोर्स, जगनाडे चौक, केडीके कॉलेज जवळ, नागपूर, 3) अरूण लक्ष्मणजी राऊत, वय 60 वर्ष, रा. डी 11, श्रीनाथ साईनगर, रामेश्वरी रिंग रोड, 4) ईश्वर नत्थुजी दिवटे, वय 50 वर्ष, रा. आशीर्वाद नगर, म्हाळगीनगर चौक,

नागपूर यांनी संगणमत करून पो.स्टे. सक्करदरा हद्दीत आशीर्वाद नगर येथील अखिल खेडूला कुंनबी समाज बिडी पेठ, रिंग रोड, हे विभागीय कृष्णी सहसंचालक नागपूर विभाग यांना किरायाने दिल्याचे 80,000 रू व कॅटर्सचे 62,635 रू असे एकुण 1,42,635 रू प्राप्त केले त्याबाबत मा. सहा. धर्मदाय आयुक्त, नागपूर यांनी चौकशी केली असता आरोपीतांनी बनावट पावती तयार करून मा. सहा. धर्मदाय आयुक्त यांचेकडे सादर केल्या. तसेच मा. कृषी सहसंचालक यांचे कडून प्राप्त झालेले पैसे समाजाचे अकाउंटला जमा न करता आरोपी क्र. 4 याचे अकाउंटला जमा करून पैसे काढुन आरोपीतांनी स्वतःचे फायद्याकरीता उपयोग करून अपहार केला. याप्रकरणी फिर्यादी सौ. अनिता अनंत ढेंगरे, वय 39 वर्ष, रा. भाग्यश्री लेआउट, त्रिमुर्ती नगर, नागपूर यांनी दिलेल्या तक्रारीवरून पो.स्टे. सक्करदरा येथे पोउपनि व्हि. मात्रे, 8552911900 यांनी आरोपीविरूध्द कलम 408,468,471,34 भादंवि अन्वये गुन्हा नोंदविला आहे.

<u>2) जरीपटका</u> – दिनांक 12.02.19 चे 1200 वा चे सुमारास फिर्यादी सौरभ राजेंन्द्र मिश्रा, वय 35 वर्ष, रा. प्रेमनगर, इतवारी, नागपूर यांचे पो.स्टे. जरीपटका हद्दीत नारा रोड, डोमेस्टीक ॲन्ड अप्लायन्स कंपणी एच.पी. सिलेंडर गोदाम असून फिर्यादी यांनी गोडाऊन स्टॉक रजिस्टर चेक केले असता संशयीत आरोपी आदित्य प्रमोद डकाडा, वय 19 वर्ष, रा. गड्डीगोदाम, गौतम नगर, नागपूर गोडाऊन किपर याने स्वतःच्या आर्थीक फायद्याकरीता 1,60,730 रू चे सिलेंडर चा अपहार केला. याप्रकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पो.स्टे. जरीपटका येथे पोहवा अनिल, 9049799743 यांनी आरोपीविरूध्द कलम 408 भादंवि अन्वये गुन्हा नोंदविला आहे.

**<u>4) पो.स्टे. तहसील, हुडकेश्वर – शासकीय कामात अडथळा निर्माण करून पळवून नेणा–या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल :</u>**

<u>1) तहसील</u> – दिनांक 13.03.19 चे 1900 वा चे सुमारास फिर्यादी मपोशि जोशना भजनराव धुर्वे, वय 26 वर्ष, (नेमणुक पो.स्टे. कोंढाळी), या पो.स्टे. कोंढाळी येथील गुन्हयातील विधी संघर्ष ग्रस्त बालीका हिला नागपूर येथे मा. बाल न्यायालय कोर्टात सादर करणे कामी आनले व मा. न्यायालयाने रिमांड मंजुर करून तिला मुलीचे बाल सुधार गृह काटोल रोड, नागपूर येथे दाखल करण्याचा आदेश दिला फिर्यादीने तिला वैद्यकीय तपासणी करीता मेयो हॉस्पीटल येथील कॅज्वल्टी विभागासमोर उभी असतांना आरोपी राकेश उर्फ भु–या रमेश वानखडे, वय 24 वर्ष, रा. नंदनवन झोपडपट्टी, गल्ली नं 6, नागपूर याने फिर्यादीचे हाताला हिसका देवून तिचे कायदेशीर रखवालीत असलेल्या मुलीला बजाज पल्सर क्र. एमएच/49/झेड/5081 वर बसवून पळवून घेवून गेला. तसेच फिर्यादी हि तिचे कायदेशीर कर्तव्य पार पाडीत असतांना अडथळा निर्माण केला. याप्रकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पो.स्टे. तहसील येथे मसपोनि एस.एस. थोरात, 9552543556 यांनी आरोपीविरूध्द कलम 225,353,363 भादंवि अन्वये गुन्हा नोंदविला आहे.

<u>2) हुडकेश्वर</u> – दिनांक 14.03.19 चे 2230 वा चे सुमारास फिर्यादी नापोशि अतुल मानिकराव भारसाकडे, (नेमणुक पो.स्टे. हुडकेश्वर) हे पो.स्टे. हुडकेश्वर, नागपूर शहर येथे थाना हजेरी डयुटीवर हजर असतांना सौ. वैशाली रंगराव काकडे, वय 30 वर्ष, रा. प्लॉट नं 10, पी.एम.बी.एस. कॉलेज जवळ, दिघोरी, विनोबा नगर, नागपूर यांची रिपोर्ट घेत असतांना आरोपी पती रंगराव गणपतराव काकडे, वय 40 वर्ष, याने दारूच्या नशेत माझ्या बायकोची माझे विरूध्द खोटी रिपार्ट घेत आहे असे म्हणुन अश्लील शिवीगाळ केली. फिर्यादी हे आरोपीस बाहेर घेवून जात असतांना आरोपीने फिर्यादी सोबत हातापायी करून हातबुक्कीने मारहान केली. तसेच तुझ्या बायको व मुलांना उचलुन घेईन व तुमची नोकरी खातो अशी धमकी देवून सरकारी कामात अडथळा निर्माण केला. याप्रकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पो.स्टे. हुडकेश्वर येथे सपोनि एस.एस. मोले, 9923046917 यांनी आरोपीविरूध्द कलम 353,332,294,506 भादंवि अन्वये गुन्हा नोंदवून आरोपीस अटक केली आहे.

**<u>5) पो.स्टे. एमआयडीसी – विनयभंग :</u>**

दिनांक 03.03.19 चे 1500 वा ते दिनांक 14.03.19 रोजी दरम्यान फिर्यादी यांची 10 वर्षीय अल्पवयीन मुलगी हिचे ईच्छेविरूध्द आरोपी रवी नावाचा इसम वय 25 वर्ष याने तिचा पाठलाग करून व अश्लील हावभाव करून त्रास देवून विनयभंग केला. याप्रकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पो.स्टे. एमआयडीसी येथे सपोनि एस.एस. डेहनकर, 9049148875 यांनी आरोपीविरूध्द कलम 354,354(ड) भादंवि सहकलम 12 पोक्सो ॲक्ट अन्वये गुन्हा नोंदविला आहे.

6) पो.स्टे. हुडकेश्वर – चोरी :

दिनांक 14.03.19 चे 1930 वा ते 1945 वा दरम्यान फिर्यादी पुष्पलता वासुदेव धारणे, वय 66 वर्ष, रा. 146, किर्ती नगर, नरसाळा रोड, नागपूर व त्यांची बहीण कमल रगडेसह पो.स्टे. हुडकेश्वर हद्यीत दिघोरी चौकातुन एका ॲटो मध्ये बसून फिर्यादी या म्हाळगीनगर चौकात उतरल्या तेव्हा फिर्यादी यांचे लक्षात आले कि त्यांच्या जवळील पर्स ज्यात ठेवलेले सोन्याचे मंगळसुत्र किं, 60,000 रू चे दिसुन आले नाही. कोणीतरी अज्ञात चोराने चोरून नेले. याप्रकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पो.स्टे. हुडकेश्वर येथे मपोउपनि मोहारे, 9822530105 यांनी आरोपीविरूध्द कलम 379 भादंवि अन्वये गुन्हा नोंदविला आहे.

7) पो.स्टे. जरीपटका – पळवून नेणा–या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल :

दिनांक 14.03.19 चे 1300 वा चे सुमारास फिर्यादी डेडी वारम्बे (परी विकास अधिकारी) रा. शासकीय वसाहत क्वॉटर नं 23/4 रविनगर, नागपूर यांचे शासकीय मुलांचे निरिक्षण बालगृह पाटणकर चौक नागपूर या संस्थेत दाखल प्रवेशीत बालक रजक सुभाष बहुलवार, वय 15 वर्ष, हा पो.स्टे. जरीपटका हद्यीत समता विद्यालय, संजय नगर नागपूर या शाळेतुन अचानक निघुन गेला. परत आला नाही. याप्रकरणी पो.स्टे. जरीपटका येथे पोहवा अनिल 9049799743 यांनी कलम 363 भादंवि अन्वये गुन्हा नोंदविला आहे.

पोलीस जनसंपर्क अधिकारी
नागपूर शहर